## सोमवार, दिनांक २१ मार्च २०११

विधानसभेची बैठक, विधान भवन, मुंबई येथे सोमवार, दिनांक २१ मार्च २०११ रोजी सकाळी १२.०० वाजता सुरू झाली.

**माननीय अध्यक्ष श्री. दिलीप वळसे-पाटील हे अध्यक्षस्थानी होते.**

---

**(अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष)**

### माननीय राज्यमंत्री श्री. सचिन अहिर व सन्माननीय सदस्य श्री. अमित देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन

**अध्यक्ष :** माननीय राज्यमंत्री श्री. सचिन अहिर व सन्माननीय सदस्य श्री. अमित देशमुख यांचा आज वाढदिवस आहे. सभागृहाच्या वतीने आपण त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा देऊ या.

---

## तोंडी उत्तरे

**(तारांकित प्रश्न)**

### केज (जिल्हा बीड) तसेच लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेतीच्या झालेल्या नुकसानीची शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळण्याबाबत.

* **३९६४६. डॉ. विमलताई मुंदडा** (केज), **श्री. प्रदीप शिवनारायण जैस्वाल** (औरंगाबाद-मध्य), **डॉ. शिवाजीराव पाटील-निलंगेकर** (निलंगा) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) केज (जिल्हा बीड) विधानसभा मतदार संघातील गत पावसाळी हंगामात पंचनामे झालेल्या शेतीच्या नुकसानीबाबतची नुकसानभरपाई संबंधित शेतकऱ्यांना मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०१० मध्ये मा. महसूल मंत्री यांना निवेदन दिले तसेच लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यात अतिवृष्टीमुळे तलाव फुटून व नद्यांच्या पुरामुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे व पिकांचे मोठ्या प्रमाणात झालेल्या नुकसानाची शासनाने सन २०१० मध्ये घोषित केल्याप्रमाणे कोणतीही मदत केली नाही वा नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे केले नाही, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय व त्याअनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(३) अद्याप, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे पूर्ण झाले नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**डॉ. पतंगराव कदम** : (१), (२) व (३)

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात तसेच लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या शेती पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यात आले असून, बाधित शेतकऱ्यांना द्यावयाच्या मदत निधीचे वाटप करण्याची कार्यवाही क्षेत्रीय यंत्रणेमार्फत सुरू आहे.